# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली "गणेशोत्सव २०२४" आढावा बैठक संपन्न**
- **मिरा भाईंदर महानगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या नियमांचे पालन करून गणेशोत्सव साजरा करण्याचे महानगरपालिका मा. आयुक्त यांचे आवाहन**

दिनांक १४ ऑगस्ट २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली मिरा भाईंदर शहरात होणाऱ्या गणेशोत्सव २०२४ नियोजनपूर्ण साजरा करणेबाबत भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृह येथे आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) रवि पवार, उपायुक्त प्रसाद शिंगटे, शहर अभियंता दिपक खांबित, सहाय्यक आयुक्त प्रभाग १ ते ६, मिरा भाईंदर शहर पोलीस प्रशासन, गणेशोत्सव मंडळ अध्यक्ष/पदाधिकारी व महानगरपालिका कर्मचारी उपस्थित होते.

सार्वजनिक गणेशोत्सवासाठी, गणेशोत्सव मंडळांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या धोरणानुसार यथोचित पूर्व परवानगी घेणे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना बंधनकारक राहील. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सार्वजनिक मंडळांना मंडपाच्या परवानगीकरीता महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रभागनिहाय कार्यालयात यावर्षीसुद्धा एक खिडकी योजना सुरू करण्याकरीता नियोजन करण्यात आले आहे. या एक खिडकी योजनेत संबंधित प्रभागातील सर्व गणेश मंडळांना मंडपाकरीता महानगरपालिका, पोलीस प्रशासन, पोलीस वाहतूक प्रशासन तसेच अग्निशमन दल यांमार्फत विनामूल्य परवानगी देण्यात येणार आहे. त्याचबरोबर मुंबई महापालिकेच्या धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील १० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वर्ष जुने असलेले सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुढील ५ वर्षांची गणेशोस्तव परवानगी देण्यात येईल असे नियोजन करण्यात येणार असल्याचे मा. आयुक्त यांनी सांगितले.

सार्वजनिक मंडळांनी रस्त्यावर मंडप बांधताना नियमात दिलेल्या मंडपाच्या आकार एवढेच मंडप रस्त्यावर बांधण्याची परवानगी देण्यात येणार आहे. तसेच मंडप बांधताना रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे खड्डे करू नये असे सक्तीचे आदेश मा. आयुक्त यांनी सदर बैठकीत दिले आहेत. सार्वजनिक मंडळांना दहीहंडी तसेच गणेशोत्सवासाठी रस्त्यांवर कमानी बांधण्यास मनाई राहणार असल्याचे मा. आयुक्त यांनी स्पष्ट केले आहे. तरी सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी मंडप परवानगीकरीता संबंधित प्रभाग कार्यालयात परवानगी अर्ज देऊन शासनाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या वतीने करण्यात येत आहे. त्याचबरोबर गणेशोत्सव मंडप व रस्त्यावर होणाऱ्या विद्युत रोषणाईसाठी अदानी इलेक्ट्रिसिटी कार्यालयाशी संपर्क साधून व मंडळांनी त्यांना अर्ज देऊन तात्पुरत्या स्वरूपात मीटर उपलब्ध करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. गतवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मूर्ती स्वीकृती केंद्र तयार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर गतवर्षी प्रमाणे यावर्षीसुद्धा महापालिकामार्फत कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, त्याचबरोबर नियमांचे पालन करून पोलीस प्रशासनास देखील सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner